# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक :- स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. विद्या काणे

---

प्राची उजळता येती लकेरी सुरेल
घरटे सोडत पाखरू करते किलबिल
मंद वारा देतो साथ त्या स्वरांस
उमलत सुमन पसरती सुवास ॥

नाद, स्वर, सूर, लय, तान
सप्त सूरांनी आळवता गान
भूपाळी करी प्रभात मंगल
अभंग, भजन प्रसन्नती भवताल ॥

झांजा टाळ चिपळ्यांसह भजन
तबला पेटी सह होते गायन
सतार, सारंगी, सरोद, तानपूरा
सूरमेळ जमतो झंकारता तारा ॥

भावना उलगडत गीत साकारते
मग शब्दांचा हात हातात धरते
असे भाव वेगळा बाज निराला
ठाव घेण्याचा अंदाजही निराला ॥

चटक लावणी, हळूवार गजल
कव्वाली ने दणकती मैफिल
देशभक्ती गान देती स्फुरण
भावगीतांची हळूच गुणगुण॥

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

अंगाईच्या हळव्या हिंदोळ्यावरी
हलकेच नीज उतरे डोळ्यांवरी
शांततेला हलके जोजवता
विसावा देती साऱ्या जगता॥

स्वरांनी हसत, नादांवर डोलत
असे संगीत निसर्गात श्वावत
संगीत असे शाश्वत

Anahat Music Therapy